**कुटुंब नियोजन जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१७/प्र.क्र. २५२ /आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१७.

**वाचा :**

**१) उपसंचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक- उपसंआसे/ राआशिवसंवि/पीआयपी १७-१८ कुक/प्रकक्ष/४०९४-९६/१७, दिनांक ०६.११.२०१७.**

## शासन निर्णय:

कुटुंब नियोजन जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१७-१८ अंतर्गत जनजागृती व प्रसिध्दी उपक्रमास आणि त्यासाठी आवश्यक अनुदान खर्च करण्यास त्याखाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | उपक्रम | तपशिल | अपेक्षित खर्च (लाख/रुपये) |
|---|---|---|---|
| १ | मुंबई व राज्यातील इतर मनपा कार्यक्षेत्रातील कार्पोरेशनच्या व एसटी महामंडळाच्या बसेसवर कुटुंब नियोजन विषयी संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे | निधी व दरानुसार निवडक एस.टी./बेस्ट बसेसच्या दरवाजाच्या उजव्या बाजूचे साईड पॅनलवर २२ x २ फूट आकाराचा संदेश एक महिना अथवा बसतील तेवढे दिवस प्रदर्शित करुन प्रसिध्द करणे.<br>अ)सदर काम खाली नमूद केल्यानुसार संबंधीत म.न.पा.कार्यक्षेत्रासाठी बसेसवर संदेश प्रदर्शीत करण्यासाठी असलेल्या Sole rights संस्थेमार्फत करुन घेता येईल. | ५४.५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १)मनपा, ठाणे - मे.ॲक्सेल ॲड.ठाणे (वेस्ट), २)सोलापूर - प्रो- ॲक्टीव्ह इन ॲंड आऊट ॲड.विलेपार्ले, मुंबई, ३)पुणे- पायोयिर पब्लीसीटी कार्पो.प्रा.लि.पुणे ४)कोल्हापूर - मे. आऊटदेअर, कोल्हापूर ५)कल्याण - मे.सन एन ॲड टार ॲड.प्रा.लि. पुणे<br>आ) उर्वरीत मनपा कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या निवडक एसटी बसेसवर महामंडळाने एकाधिकृत केलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत काम करून घेण्यात येईल. तसेच मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवडक बेस्ट बसेसवर sole rights दिलेल्या मे.राकेश ॲडव्हर्टायझर्स, मुंबई या संस्थेमार्फत मंजूर निधीच्या अधीन राहून करून घेण्यात येईल. | |
| २ | राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी एस.टी.बसेसमध्ये कुटुंब नियोजनाविषयी संदेश आसनाच्या पाठीमागे, हॅन्डलवर संदेश प्रदर्शित करुन प्रसिध्दी करणे | जिल्हयातील निवडक एस.टी.बसमध्ये आसनाच्या पाठीमागे ३०० मी.मी.x ६०० मी.मी. व ३५० मी.मी.x ५९० मी.मी.आकाराचे संदेश प्रदर्शीत करणे. (एका बसवर एक महिण्यासाठी संदेश प्रसिध्द करण्याचा खर्च प्रती बस ३८ आसनप्रमाणे)<br>प्रदर्शन भाडे रु.५४००/-<br>+ प्रिंटींग चार्जेस- २८५०/- (प्रती सीट रु.७५/-)<br>+संदेश फिक्सींग चार्जेस रु.७६००(प्रती सीट रु.२००/)<br>--------------------------------------------<br>एकूण रु. १५८५०/-<br>+१८% जीएसटी = २८५३<br>----------------------------------------<br>एकूण सर्व रु. १८७०३/- | ५६.४८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याप्रमाणे एकूण ३०२ बसेसवर संदेश प्रदर्शित करणे. सदर काम एसटी बसेसमध्ये सीटच्या मागे संदेश प्रदर्शीत करण्यासाठी नियुक्त मे.ओम ॲडव्हर्टायझींग या sole right संस्थेकडून त्याचेकडील दरानुसार करुन घेण्यात येईल | |
| ३ | डिजीटल पीव्हीसी बॅनर्स छपाई करणे | **आकार** - ५ फूट x ३ फूट = १५ स्क्वे.फुट<br>**छपाई**- सचित्र, अडकवण्या -साठी आयलेट सुविधा.<br>**एकूण संख्या**- ७६०५६ बॅनर्स<br>(प्रति स्क्वे.फुट दर रु.७.१०/- (लावणे व काढणे वगळून) प्रमाणे १५ स्क्वे.फुट आकाराच्या एका बॅनरसाठी रु.१०६.५०/- इतका खर्च (जीएसटी व सर्व खर्चासहित)<br>शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.१४.०७.२०१६ नुसार बॅनर्स छपाई करुन पुरवठा करण्यासाठी मे.कल्याणी कार्पोरेशन पुणे ही संस्था नियुक्त करण्यात आली आहे. सदर संस्थेच्या दरानुसार मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे बॅनर्स तयार करून जिल्हयांना पुरवठा करण्यात येईल. | ८१.०० |
| ४ | जिल्हयातील आरोग्य संस्थांना विनायल बोर्ड तयार करुन पुरवठा करणे - | **आकार** - ३ फूट x २ फूट = ६ स्क्वे.फुट<br>उत्कृष्ट मटेरीयलचे विनायल बोर्ड निधीमध्ये बसतील तेवढया रकमेत तयार करून आरोग्य संस्थांमध्ये प्रदर्शित करण्यासाठी जिल्हयांना पुरवठा करणे<br>सदर कामासाठी ई -निविदा पध्दतीने संबंधीत संस्थेची निवउ करण्यात येईल. | ४८.०० |
| ५ | सहयाद्री दुरदर्शन वाहिनीवरुन कुटुंब नियोजन कार्यक्रमा विषयी संदेशाचा | संदेशाचा ६० सेकंदाचा टी.व्ही.स्पॉट मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे दिवस प्रसारण करणे.<br>याबाबत दूरदर्शन केंद्र वरळी,मुंबई यांना कार्यादेश देण्यात येतील. | १४.४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | टि.व्ही.स्पॉट प्रसारण करणे | | |
| ६ | आकाशवाणी केंद्रावरुन कुटुंब नियोजन कार्यक्रमा विषयी संदेशाची जिंगल प्रसारीत करणे | संदेशाचा ६० सेकंदाची रेडीओ जिंगल मंजूर निधीमध्ये बसतील तेवढे दिवस प्रसारण करणे.<br>याबाबत आकाशवाणी केंद्र,मुंबई यांना कार्यादेश देण्यात येतील | ८.३९ |
| | | | २६२.९४ |

## २. अटी व शर्ती -

१) सदर खरेदीसाठी शासननिर्णय,उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्रक्र.८२/भाग III/उद्योग-४,दि.१.१२.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारित नियमपुस्तिकेत विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. एकलस्त्रोत खरेदीबाबत सदर शासन निर्णयामधील "**शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका**" यात नमूद परिच्छेद क्रमांक ३.२.६ येथील तरतुदीनुसार तसेच विहित कार्यपध्दीस अनुसरून करण्यात यावी .

२) खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification)संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी) मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) प्रशासकीय मान्यता देतांना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

४) खरेदी करण्यात येणा-या बाबींची पुरवठापूर्व/पुरवठयानंतर नमुना तपासणी (Pre/post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विर्निदेश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल याची खात्री करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणा-या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (Storage & Distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहित मुदतीत वापर होईल याची दक्षता घेण्यात यावी.

६) सदर खरेदीची द्विरुक्ती (Duplication( होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबवितांना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelince( तंतोतंत पालन करण्यात यावे.

८) शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ मधील अटींची पूर्तता करण्यात यावी.

९) केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१०) सदर एजन्सरचे दरपत्रक रद्द झालेले नाही याची खात्री CPC पुढे जाण्यापुर्वी करण्यात यावी.

११) शासकीय कर संबंधीत यंत्रणेकडे जमा केला असल्याची खात्री केल्यानंतरच सेवा पुरवठादारास देयक अदा करण्यात यावे.

३. वर नमूद उपक्रमांसाठीचा खर्च सन २०१७-१८ च्या पीआयपी मध्ये मंजूर केलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासननिर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११३०१६०९१४१३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.30 20:41:46 +05'30'

**( रो.दि.कदम पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)आरोग्य सेवा, मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).